


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७८१. वा | शुक्रवार | दि. २४ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# वरिष्ठांकडून कर्मचाऱ्यांचा छळ,उच्च अधिकारी मात्र कुंभकर्णी झोपेत

## जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचार-अनागोंदीसह बोकाळले राजकारण


## कारवाई झालेल्या कागदपत्रांसह अहवालाची माहिती सिटी न्यूजच्या हाती

**पोस्टमार्टम १०**

**करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात चौकशी अंती दिलेल्या अहवालात कुणाकुणावर फोजदारी कारवाईचे झालेल्या आदेशाचा उलगडा पुढील सत्रात**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचार व अनागोंदी कारभाराने प्रचंड थैमान माजवलेले आहे. भ्रष्टाचाराच्या नवनव्या सुरस कथा समोर येत आहेत. एकीकडे हे सर्व काही होत असताना दुसरीकडे अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये आपापसात राजकारण प्रचंड बोकाळले आहे. त्यातूनच मग वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांचा छळ होताना दिसून येत आहे. या संपूर्ण परिस्थितीत जिल्हा रुग्णालयाचे उच्च अधिकारी कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसून येत आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांमधील वाद हा चव्हाट्यावर येऊनही उच्च अधिकारी ढिम्म असल्याचे दिसत आहे. बुलढाण्याचे जिल्हा रुग्णालय आज खऱ्या अर्थाने विनोद करण्यास आणि टीका करण्यास पात्र झालेले आहे. कारण हे रुग्णालय आहे बारा भानगडींचे केंद्र, अशी स्थिती येथे उत्पन्न झालेली आहे. भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारी अधिकारी हे या रुग्णालयाच्या पाचवीलाच पुजलेले आहेत.अनेक वर्षे सातत्याने भ्रष्टाचार करून पोट फुगलेल्या अधिकाऱ्यांचा या ठिकाणी भरणार आहे. अनेक अधिकारी या ठिकाणाहून अजीर्ण होईस्तोवर भ्रष्टाचार करून गेले, परंतु साथा ढेकरही दिला नाही. कोरोना महामारीच्या काळात तर या रुग्णालयात भ्रष्टाचाराचे नवनवे उच्चांक स्थापित झाले. कोरोनाच्या काळात प्रचंड उपकरणे व औषधांची खरेदी या ठिकाणी केली गेली खरी, परंतु यातील बहुसंख्य साहित्य उपकरणे व औषधी कधी रुग्णालयापर्यंत पोहोचलीच नाही. याशिवाय या ठिकाणी काम करणारे डॉक्टर, कर्मचारी हे अत्यंत मनमानीपणे वागताना दिसून येत आहेत. नुकताच एक २३ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार जिल्हा रुग्णालयात समोर आलेला आहे. या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे जिल्हा रुग्णालयात अधिकारी-अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड राजकारण व सुंदोपसुंदी माजली आहे. कदाचित हिस्सेवाटीवरूनच हे राजकारण बोकाळलेले असावे. यावरूनच रुग्णालयातील एका लिपिकाला वरिष्ठ अधिकारी तथा वीजतंत्री असलेल्या अंभोरे यांनी प्रचंड मानसिक त्रास दिल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित लिपिकाने अंभोरे यांच्याकडून होणाऱ्या छळाबाबत वारंवार जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांना याची माहिती दिली, परंतु वरिष्ठ अधिकारी मात्र कुंभकर्णी झोपेत असल्या कारणाने कनिष्ठ लिपिकास कोणतीही मदत मिळाली नाही. आपल्याच अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये राजकारण बोकाळलेले आहे, वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांना त्रास देतात, याची सातत्याने माहिती मिळून देखील वरिष्ठ अधिकारी एव्हढ्या निर्लज्जपणे निष्क्रिय का राहिले, हा मोठाच प्रश्न आहे. अंभोरे यांच्यासारखे अधिकारी ही शासनाचे जावई आहेत की काय, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये राजकारण किंवा वरिष्ठांकडून कनिष्ठांची छळवणूक होत असेल तर ती रोखण्याचे काम तातडीने होणे गरजेचे होते. मात्र, वरिष्ठ अधिकारी केवळ भ्रष्टाचार करण्यात आणि स्वतःच्या तुंबड्या भरण्यात मश्गुल असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. बिकट परिस्थितीचा आणि कायद्याचा फायद्या घेऊन विना टेंडरिंग प्रक्रिया कंत्राटदाराला २३ कोटींचे कंत्राट देण्यात अधिकारी तत्परता दाखवतात. एव्हढेच नाही तर त्याला ८० टक्के रक्कम देण्यापर्यंतही यांची मजल जाते. टक्केवारीच्या नादात अधिकारी काही कामे खूपच वेगाने करतात. परंतु आपल्याच कार्यालयात होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या छळाबाबत मात्र कुंभकर्णी झोपेत असतात.




एव्हढी अनागोंदी सध्या जिल्हा रुग्णालयात व आरोग्य विभागात माजली असल्याचे स्पष्ट होते. भ्रष्टाचारात सजग राहणारे व आपल्या कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्याची वेळ आल्यास कुंभकर्णी झोपेत जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने शिवधनुष्य उचलले आहे. जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना शासनासमोर हात बांधून गुन्हेगाराप्रमाणे उभे करीत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली भ्रष्टाचारविरोधातील भूमिका कणखरपणे मांडतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# सिनेस्टाइल पाठलाग करून तहसीलदारांनी पकडला टिप्पर!

**जनसंचलन/मेहकर**

परिसरात मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध वाहतूक करण्यात येत आहे. वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभाग ॲक्शन मोडवर आला असून, मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके यांनी दि. २३ मे ला सिनेस्टाइल पाठलाग करून एक टिप्पर पकडले. हे टिप्पर कारवाईसाठी मेहकर पोलिस स्टेशनला लावण्यात आले आहे. मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके यांनी पुन्हा भर उन्हात मेहकर येथे सुलतान पूर कडून येणारे टिप्पर क्रमांक एम.एच.२८ बी.ए.२०९४ हे पकडले आहे. त्यांची तपासणी केली असता सदर टिपी वरील वेळ निघून गेली होती त्यामुळे सदर टिप्पर मेहकर शहर पोलिस ठाण्यात कारवाईसाठी नेण्यात आले आहे, मेहकरचे तहसीलदार निलेश मडके हे सध्या अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर यांचे कर्दनकाळ



ठरले आहे.धडाकेबाज कारवाई त्यांनी व त्यांच्या पथकाने केली आहे.

# शुल्लक कारणावरून पतीने पत्नीस केली मारहाण

**जनसंचलन/खामगाव**

लग्नाला जाण्यावरुन वाद झाला असता पतीने पत्नीला मारहाण करुन जखमी केल्याची घटना तालुक्यातील लोणी गुरव येथे मंगळवारी घडली. याबाबत सौ. संजीवनी सुबोध वानखडे वय २० हिने ग्रामीण पोस्टेला तक्रार दिली की, तिचा पती सुबोध भगवान वानखडे याने लग्नाला जाण्याच्या कारणावरुन वाद घालून तिला मारहाण केली. तसेच चरित्र्यावर संशय घेत शिविगाळ



करून जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी सुबोध वानखडे याच्या विरुध्द कलम ३२३, ३२४,५०४,५०६भादंवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तहसीलदारांनी पकडला अवैध रेतीचा वाहतूक करणारा टिप्पर!

## पोलिस स्टेशनमध्ये केला जप्त रेती माफियांचे धाबे दणाणले!

**जनसंचलन/ डोणगांव**

परिसरात मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध वाहतूक करण्यात येत आहे. वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभाग ॲक्शन मोडवर आला असून, मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके यांनी दि. २१ मेच्या रात्री सिनेस्टाइल पाठलाग करून एक टिप्पर पकडले. हे टिप्पर कारवाईसाठी डोणगाव पोलिस स्टेशनला लावण्यात आले आहे. मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके, डोणगाव तलाठी अनुप नरोटे व अमोल राठोड व सुरक्षा रक्षक बोराडे हे डोणगांव ते मेहकर रोडवर जात असताना त्यांना एक रेतीने भरलेला टिप्पर डोणगाव कडे जाताना दिसला. या पथकाने त्याचा पाठलाग करून नागापूर जवळ त्याला थांबवून तहसीलदार नीलेश मडके यांनी टिप्पर चालक विजय छगन जाधव रा. मंठा यास चौकशी केली असता त्याने वेळ झालेली पावती दाखविली. टिप्पर




क्रमांक विचारला असता त्याने एमएच २१ बीएच ४३३३ असा सांगितला. हे टिप्पर हे पोलिस ठाण्यात लावले.

# आरोग्य सेवक पदावर नौकरी लावून देतो म्हणत ३ लाख ८८ हजार रू फसविले

## खामगाव तालुक्यातील सोपान चौक, विश्वनाथ चौके विरुद्ध गुन्हा दाखल!

**जनसंचलन/ खामगाव**

तुमच्याकडे दारिद्र्य रेषेचे कार्ड असेल तर तुमच्या मुलाला आरोग्य सेवक पदावर नौकरी लावून देतो असे सांगून ३ लाख ८८ हजार घेवुन खोटे नियुक्ती पत्र देवून फसवणूक केल्याची घटना खामगावच्या दुधा गावात उघडकीस आली आहे. झाले असे की, समाधान सदाशिव पांढरे (४०)( रा. दुधा ता.खामगाव जि.बुलडाणा) यांना विश्वनाथ किसन चौके ( रा. दुधा ता.खामगाव जि.बुलडाणा) याने तुमच्याकडे दारिद्र्य रेषेचे कार्ड असेल तर तुमच्या मुलाला आरोग्य सेवक म्हणून नौकरी लावून देतो, असे म्हणत समाधान पांढरे यांच्याकडून दारिद्र्य रेषेचे कार्ड घेतले. ९ ते २० ऑक्टोबर २०२३ दरम्यान नगदी २ लाख ९८ हजार रुपये पांढरे यांनी विश्वनाथ चौके यांना दिले होते. बाकी ९० हजार रुपये ऑनलाइन पाठविले असे एकुण ३ लाख ८८ हजार रुपये दिले. सोपान




दिगांबार चौके (रा.पेडका ता.खामगाव जि.बुलडाणा) याने पांढरे यांच्या मुलाला आरोग्य सेवक पदाचे नियुक्तीपत्र दिले होते. मात्र मिळालेले नियुक्ती पत्र खोटे असल्याचे पांढरे यांच्या लक्षात येताच आपली फसवणूक झाली असल्याचे समाधान पांढरे यांच्या लक्षात आले. त्यांनी २१ मे २०२४ रोजी हिवरखेड पोलीस स्टेशनला तशी तक्रार दिली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी विश्वनाथ चौके व सोपान चौके या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पीएसआय सुरेश रोकडे करीत आहेत. विशेष म्हणजे सोपान चौके याने याअधी सुद्धा अनेकांची फसवणूक केली आहे.खामगाव ग्रामीण पोलिसात त्याच्याविरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. सध्या तो जामिनावर बाहेर होता.

# अल्पवयीन मुलीला पळविले तिघांवर गुन्हा दाखल

**जनसंचलन/मोताळा**


तालुक्यातील कोथळी येथील एका साडेपंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीला पळवून नेले. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी तिघांवर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. अल्पवयीन मुर्लीच्या वडिलांनी बोराखेडी पोस्टे.ला दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, त्यांची १५ वर्ष ५ महिन्याच्या अल्पवयीन मुलगी घरात झोपलेली असतांना तिला २० मे रोजी तिघांनी फूस लावून पळवून नेले. अशा फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी संजय लक्ष्मण शिरकारे, गणेश संजय शिरकारे, विजय संजय शिरकारे सर्व रा. कोथळी यांच्यावर भादंवीचे कलम ३६३,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सफो. यशवंत तायडे हे करीत आहे.

# शेतरस्त्याच्या कारणावरून दोन कुटुंबात हाणामारी

## नांदुरा तालुक्यातील पोटा येथील घटना

**जनसंचलन/मोताळा**

शेतरस्ता तथा पाण्याच्या पाइपलाइनच्या कारणावरून दोन कुटुंबात लोखंडी रॉड आणि काठीने हाणामारी झाल्याची घटना २२ मे रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास पोटा येथे घडली. प्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटातील सहा जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदुरा तालुक्यातील पोटा येथील रामेश्वर पुंडलिक सरोदे यांनी बोराखेडी पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार बुधवारी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ते घरासमोर असताना गावातीलच शंकर श्रीराम सरोदे यांनी शेतीच्या रस्त्याच्या कारणावरून रामेश्वर सरोदे आणि त्यांच्या भावाला शिवीगाळ केली. त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता ट्रॅक्टरच्या टॉमीने मारहाण केली. दरम्यान गणेश शंकर सरोदे आणि उमेश शंकर सरोदे यांनी काठीने मारहाण केली अशा तक्रारीवरून तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या गटातील शंकर श्रीराम सरोदे यांनीही तक्रार दिली आहे.



त्यानुसार त्यांची पुंडलिक बाबुराव सरोदे, रामेश्वर पुंडलिक सरोदे आणि नामदेव पुंडलिक सरोदे यांच्या शेताच्या शेजारी विहीर असून ते आसपासच्या लोकांना शंकर सरोदे यांची पाइपलाइन अडविण्यास सांगत आहे. याबाबत त्यांना विचारणा केली असता तिघांनी संगनमत करून बुधवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास लोटपाट, शिवीगाळ करीत रामेश्वर सरोदे यांनी लोखंडी टॉमी मारून जखमी केले. शंकर सरोदे यांच्या मुलाने भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी केली असता नामदेव सरोदे यांनी खांद्यावर मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली. अशा तक्रारीवरूनही तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल सुपडासिंग चव्हाण हे करीत आहे.

# रानडुक्कर आडवे आल्याने दुचाकीचा अपघातः १ ठार १ जखमी...



**जनसंचलन/ शेगाव**

येथील वरवट रोडवरील हॉटेल गौरव जवळ २१ मे रोजी रात्री ११ वाजता रानडुक्कर आडवे आल्याने दुचाकीचा अपघात होऊन १ जण जागेवरच ठार झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. याबाबत डॉ. अतुल पाटील समोसा रुग्णालयात शेगाव तर्फे कक्षसेवक गोविंदा पिवाल वय ३८ यांनी मेमो आणून सादर केला की ओपीडी नं ०७९० मधील रुग्ण नामे मोहमद हमीद शेख आमल वय ५५ रा. डगडाळीपुरा शेगाव याचा कालखेड रोड गौरव हॉटेल जवळ अपघात झाला असून मृत अवस्थेत त्यास सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य रुग्णालयात तरी आणले. तर यावेळी विश्वास दयाराम अरबट वय ५३ अकोट रोड शेगाव हे गंभीर जखमी झाले आहेत. मो. हमीद शेख आमल हे होंडा शाईन दुचाकीने शेगावकडे येत असताना हा अपघात घडला आहे. याप्रकरणी शहर पोलिसात कलम १७४ नुसार मर्ग दाखल करण्यात आला आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राष्ट्रीय महामार्गावरील दोन अपघातात १७ जण जखमी..

## पाच गंभीर जखमींना केले बुलढाणा- अकोला रेफर




जनसंचलन/मलकापूर

राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी रात्री व पहाटे घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात १७ जण जखमी झाले. त्यापैकी पाच गंभीर जखमींना बुलढाणा व अकोला रेफर करण्यात आले आहे. १२ जणांवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. पालघर येथील लोकसभा निवडणूक आटोपल्यावर एम.एच.१४ बी.टी. ३८८२ क्रमांकाची बस गृहरक्षकांना घेऊन अकोला जात होती. मंगळवारी रात्री २ वाजताच्या सुमारास भरधाव बसने राष्ट्रीय महामार्गावरील मलकापूर नजीकच्या पेट्रोल पंपाजवळ ओव्हरब्रिज वरील दुभाजकाला धडक दिली. या अपघातात बसचालकासह १४ जण जखमी झाले. त्यापैकी गोपाल जाधव (वय २८) रा. जवळा बु. व संतोष दामोदर गणोजे (वय ४२) रा. कोळंबी मूर्तीजापूर या दोघांना पुढील उपचारासाठी अकोला रेफर करण्यात आले. उर्वरित १२ जणांवर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. उपचारानंतर त्यांना सुटी देण्यात आली. याप्रकरणी शहर पोलिसांनी बसचालक दीपक भाऊराव मडावी (वय ४९) रा. यवतमाळ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील दख्खन ऑटो सर्व्हिस सेंटर जवळ पहाटे ४ वाजताच्या सुमारास जी.जे. १८/ बी.टी.८५३८ क्रमांकाचा ट्रक व एन.एल.०१ /ए.एफ.६७०१ क्रमांकाच्या कंटेनरची समोरासमोर धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनातील मोहम्मद इकरार मोहम्मद जुबेर (वय ३८) रा. अहमदाबाद, मोहम्मद सादीक मोहम्मद नफीस (वय ४२) इलाहाबाद व अजय अमरसिंह वासकले (वय २१) रा. सेंदवा मध्यप्रदेश असे तीन जण गंभीर जखमी झाले. त्यांना बुलढाणा रेफर करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिस तपास सुरू आहे.


# नांदुरा येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त आयोजित कीर्तन उत्साहात संपन्न...



जनसंचलन/ नांदुरा

नांदुरा येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त २२ मे रोजी भारतीय ज्ञानपीठ हायस्कूल येथे सायंकाळी ०७ वाजता भव्य कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मलकापूर येथील कृ.उ.बा.समितीचे सभापती मा.शिवचंद्र तायडे साहेब होते तर प्रमुख उपस्थिती मलकापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.राजेश एकडे साहेब,वारकरी सेना महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रामभाऊ झांबरे,नांदुरा मा.न.प.उपाध्यक्ष लालाभाऊ इंगळे,जिजाऊ ब्रिगेड बुलढाणा जिल्हा उपाध्यक्षा सौ. कोमलताई सचिनराव तायडे,संभाजी ब्रिगेड बुलढाणा जिल्हाध्यक्ष योगेश पाटील,महाराष्ट्र धोबी समाज प्रदेश उपाध्यक्ष श्यामभाऊ डंबेलकर, तर विशेष उपस्थिती मधे नांदुरा कृ.उ.बा.समितीचे सभापती भगवान धांडे ,उपसभापती प्रदीप हेलगे,गौरव पाटील,मोहन गावंडे,पुरुषोत्तम झाल्टे,भानुदास तितरे, व इतर संचालक मंडळ उपस्थित होते.या कार्यक्रमात कीर्तनकार महाराज हभप डॉ.बालाजी महाराज जाधव यांनी आपल्या सुमधुर वाणी आणि तडफदार भाषाशैलीत अंगावर काटा येईल असे संभाजीराजे यांच्या आयुष्यातील महत्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले.यामधे ८ वर्षांचे शंभुराजे पुरंदरच्या तहात मिर्झाराजे रामसिंग यांच्याकडे स्वराज्याखातर ओलीस राहिले येथील शंभूराजांचे आचरण व बुद्धीचातूर्य ते आग्र्याच्या कैदेतील शंभूराजांची चपळाई,पुढे त्यांनी आपल्या बुद्धीचातुर्या/चपळाईने/ गणीमोकाव्याने युध्दात,राजकारणात केलेली प्रगती,स्वराज्याचा वाढविलेला फौजफाटा व अमाप खजिना,मिळविले किल्ले,यशस्वी अजिंक्य योद्धा याबद्दल अंगावर शहारे आणणारे प्रसंग महाराजांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून सांगितले.या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील शेकडो शंभूप्रेमी सर्व वयोगटातील स्त्री - पुरुषांनी हजेरी लावली व हा कीर्तनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.यासाठी सार्वजनिक छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते अमर रमेश पाटील, संजू पाटील,मंगेश सोळंके,कुलदीप डंबेलकर,दिलीप कोल्हे,सचिन बाठे,अभिषेक सोळंके,वैभव सपकाळ,विनोद वनारे,सचिन गणगे,हिमांशू अवचार,रुपेश पवार,पवन सोळंके,संतोष सोळंके आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे उत्कृष्ठ असे सूत्रसंचालन श्री विकास मुके सर यांनी केले,कार्यक्रमाची प्रस्तावना अमर रमेश पाटील तर आभार प्रदर्शन मंगेश सोळंके यांनी केले.या कार्यक्रमाला भारतीय ज्ञानपीठ हायस्कूलचे प्रशस्त मैदान नि:शुल्क उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष सन्माननीय बबलू जुनगडे यांचा विशेष सत्कार यावेळी घेण्यात आला. व या कार्यक्रमाला सहकार्य करणारे शाळेचे प्राचार्य पाटील सर व महादेव इंगळे सर यांचे सुद्धा आभार व्यक्त करण्यात आले.

# १५ दिवसांपूर्वी विवाह झालेल्या व्यापाऱ्याचा सर्पदंशाने मृत्यू



जनसंचलन/संग्रामपूर

वरवट बकाल येथील रंगाचा व्यवसाय करणारे व्यापारी संदीप शेषराव तेटू (वय ३१ वर्ष) हे नेहमी प्रमाणे वरवट बकाल बस थांब्यावरील रंगांच्या दुकानात २२ मे रोजी सकाळी गेले असता त्यांना सर्पदंश झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. संदीप तेटू यांना प्रथम खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना शेगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी त्यांचा मृत्यू झाला. संदीप यांच्या लग्नाला दोन आठवडेच झाले आहे. त्यांचा संसाराचा गाडा सुरू झाला असताना त्यांचा मृत्यू झाल्यामुळे वरवट बकालसह सुनगाव मध्ये शोककळा पसरली आहे. सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पच्यात पत्नी, एक भाऊ, आई-वडील असा आप्त परिवार आहे.

# कुत्र्याला दगड मारल्याने वाद घालत युवकास केली मारहाण



जनसंचलन/ खामगाव

वाडी येथे जय माता दी नगरातून फिर्यादीचे वडील कृष्णराव डोसे व त्यांच्या पाठीमागून पाळीव कुत्रा जात असतांना १९ मे रोजी सायं. ७ वा. च्या सुमारास संतोष महादेव बाजळ (रा. वाडी) याने कुत्र्याला दगड् मारला. याबाबत कृष्णराव डोसे यांनी विचारणा केली असता त्यांना संतोष बाजळ याने शिवीगाळ केली. त्यामुळे अक्षय डोसे याने त्याला शिवीगाळ करू नको असे म्हटले होते. त्यामुळे चिडून काही वेळानंतर त्याने फिर्यादीच्या पाठीवर व गालावर कुऱ्हाडीचा दांडा मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अक्षय डोसे यांच्या फिर्यादीवरून शहर पोस्टेला उपरोक्त आरोपीविरुध्द भादंवि कलम ३२४, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला.

# शेतमजुराला केली जबर मारहाण; गुन्हा दाखल



जनसंचलन/ देऊळगाव राजा

खल्ल्याळ गव्हाण भरण्यासाठी शिरूर जोशी व बाजीराव येथे शेतमजूर शेख जुबेर शेख हबीब (३४) यास तिघांनी अकारण वाद घालत जबर मारहाण केल्याची घटना २१ मे रोजी घडली. प्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शेख जुबेर शेख हबीब हा गावातील लिंबा चव्हाण यांचे शेणखत नाना खंडागळे यांच्या सोबत जात असताना आरोपी विठोबा पोंधे याने शेतमजुरासोबत विनाकारण वाद घालत शिवीगाळ करत मारहाण केली. दरम्यान, रामकिसन आदबने आणि शिरूर जोशी यानेही त्यास मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल केला.

# ईव्हीएम मध्ये घोटाळा केला तर बदला घेतला शिवाय राहणार नाही...

## मुख्य निवडणूक आयुक्ताचा मर्डर करेल - माजी मंत्री सावजी यांची धमकी



जनसंचलन/मेहकर

राज्यासह देशभरात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात ४८ पैकी ४० जागा या महाविकास आघाडीला मिळणार आहेत. अशी स्थिती असताना निवडणूक आयोगाने जर ईव्हीएम मशीन मध्ये घोटाळा केला तर आपण त्याचा बदला मी घेतल्याशिवाय राहणार नाही. राज्यातील सर्व मतदारांच्या वतीने मी आपला मर्डर करेल अशी थेट धमकी राष्ट्रवादीचे माजी महसूल मंत्री सुबोध सावजी यांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना दिली आहे त्या संदर्भातील पत्र थेट त्यांच्या दिल्ली कार्यालयाला पाठवले असल्याने एकच खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी महसूल मंत्री तथा अकोला व बुलढाणा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री सुबोध सावजी हे आपल्या विविध अनोखे आंदोलन आणि अधिकाऱ्यांना जनतेच्या प्रश्नांसाठी धमक्यांसाठी प्रसिद्ध आहेत. संभाजी भिडे गुरुजी जिल्हा परिषदेतील अधिकारी यांच्या मर्डरची देखील त्यांनी मागच्या काळात धमकी दिली होती. आता पुन्हा त्यांनी थेट देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त यांचाच गळा दाबून ठार मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. यासंदर्भात माजी मंत्री सावजी यांनी थेट मुख्य निवडणूक आयुक्तांनाच पत्र लिहिले आहे.या पात्रात त्यांनी नमूद केले आहे कि, लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात असलेला मतदाराचा कौल हा महाविकास आघाडी या पक्षांकडेच आहे. या आधारे एकुण ४८ जागापैकी ३८ ते ४० लोकसभेच्या जागा या महाविकास आघाडीच्या येणारचं परंतु जनतेच्या व माझ्या मनात संशय आहे की, आपण ई.व्ही.एम. मशीन मध्ये घोटाळा करुन लोकांच्या मतदानाचा लोकशाहीचा गळा घोटणार आहातं असे घडल्यास महाराष्ट्रातील मतदारांच्या वतीने या अन्यायाच्या विरोधात मी आपला गळा घोटल्या शिवाय राहणार नाही. माझे वय सध्या ८० वर्षाचे आहे. आता १० किंवा २० वर्ष जगायचे आहे. माझ्या डोळ्यादेखत महाराष्ट्रातील करोडो मतदारांच्या लोकशाही पध्दतीने वापरलेल्या मतदारांच्या अधिकाराचा आपण जर उघड-उघड खुन करणार असाल, मुदा पाडणार असाल तर मी या मतदारांच्या हक्काच्या सन्मानार्थ आपला मुडदा पाडेल किंवा खुन करण्यास मागे पुढे पाहणार नाही व लोकशाहीच्या इतिहासात मी माझे नाव अजरामर करेल. असे नमूद केले आहे.

# सहकार विद्या मंदिर येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती साजरी

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अदृश्य आभासी पुतळ्याचे अनावरण प्रमुख पाहुण्याच्या हस्ते संपन्न









जनसंचनलन/बुलढाणा

सहकार विद्या मंदिर बुलढाणा येथे दि २३ मे २०२४ रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. यावेळेस विशेष पूज्यनिय यश भंते श्रीलंका व पूज्यनिय जिवक बोधी भंते यांच्या हस्ते बुद्ध वंदना परित्राण पाठ घेऊन बुद्ध जयंती साजरी करण्यात आली आहे. तसेच यश सिद्धी सैनिक सेवा संघाच्या वतीने महार रेजिमेंट च्या सैनिकांनी पंचशील धम्म ध्वजाला वंदनीय भिख्खू संघाला मानवंदना देण्यात आली आहे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी किरण पाटील, बुलढाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी, चीप मॅनेजिंग डायरेक्टर बुलढाणा अर्बन डॉक्टर सुकेश झंवर, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्षा कोमल ताई झंवर, नगरपरिषद मुख्याधिकारी गणेश पांडे अतिरिक्त आयुक्त आयकर विभाग पुणे राजेश गवळी, आचार्य तेजराव इंगळे आदिलोक उपस्थित होते हा कार्यक्रम संपल्यानंतर लगेच दुसरा कार्यक्रम घेण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अदृश्य आभासी पुतल्याचे आज प्रमुख पाहुण्यांचे असते अनावर करण्यात आले आहे यश सिद्धी सैनिक सेवा संघ बुलढाणा तर्फे मानवंदना देण्यात आली तर या कार्यक्रमाला राजकारणी व्यापारी व सरकारी अधिकारी तसेच संस्थेची सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे दुचाकीस्वार तरुण ठार!

## लाखनवाडा -घारोड रोडवरील घटना!





जनसंचलन/ सिंदखेडराजा

अज्ञात वाहनाच्या धाडकेत दुचाकीस्वार दोन तरुण ठार झाल्याची धक्कादायक घटना खामगावच्या घारोड गावात घडली आहे. २२ मे रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास अजय प्रल्हाद इंगोले (२०), सम्राट रामेश्वर इंगोले (१९)( रा.घारोड, ता. खामगाव जिल्हा बुलढाणा) हे तरुण रात्री नऊ वाजताच्या दरम्यान दुचाकी क्रमांक एम एच १५ डीएक्स १७९७ ने दाढी- कटिंग करण्यासाठी लाखनवाडा येथे गेले होते. सकाळपर्यंत घरी परतलेच नाहीत.२३ मे रोजी सकाळी सात वाजताच्या सुमारास घारोड - लाखनवाडा दरम्यान रायबरी शिवरातील मालगिरी बाबा मंदिरासमोरील डोंगराच्या पायथ्याशी नाल्याजवळ दोन युवक मृता अवस्थेत पडून असल्याची माहिती मिळतात त्यांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी अष्टपाल प्रल्हाद इंगोले (३०) यांनी तशी तक्रारी हिवरखेड पोलीस स्टेशनला दिली आहे. पुढील तपास एएसआय आनंदा वाघमारे करीत आहेत.

# जिल्हा परिषद शाळेला मध्यरात्री लागली भीषण आग!

## आगेत शाळेतील साहित्य जळून झाले खाक!



जनसंचलन/खामगाव

मध्यरात्री ३ वाजताच्या दरम्यान खामगावच्या मुलांच्या जिल्हापरिषद शाळेला आग लागल्यानेशाळेतील साहित्य जळून खाक झाल्याची माहिती मिळत आहे. खामगाव शहरातील नांदुरा रोडवरील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेच्या इमारतीला २३ मे च्या रात्री ३ वाजताच्या सुमारास भीषण आग लागून शाळेचे सर्व साहित्य जळून खाक झाले आहे. रात्री ३ वाजताच्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर नागरिकांनी खामगाव अग्निशमक दलाला माहिती दिली. अग्निशमन दलाला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठूनआगीवर नियंत्रण मिळविले. मात्र लागलेल्या या भीषण आगीत शाळेचे सर्व कागदपत्रे व साहित्य जळून मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. आग कशी व कशामुळे लागली हे सध्य कळू शकले नाही.विशेष म्हणजे यापूर्वी रेल्वे स्टेशनच्या पाठीमागे असलेल्या खामगाव पालिकेच्या शाळेतही रात्रीच्या दरम्यान अशीच आग लागल्याची घटना घडली होती.

# दुचाकीचा अपघात; एकाचा मृत्यू




जनसंचलन/ शेगाव

रानडुक्कर आडवे आल्याने झालेल्या दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना २१ मे रोजी घडली. शहरातील डगडाळीपुरा भागातील रहिवासी मो. हमीद शे. आलम (५५) दुचाकीने शेगावकडे येत असताना रानडुक्कर आडवे आल्याने अपघात झाला. या अपघातात मो. हमीद यांचा मृत्यू झाला. दुचाकीवर मागे बसलेले विश्वास अरबट गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.